# कर्नल आर.डी.निकम सैनिक सहकारी बँक लि.

## सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खातेदार

## * वैयक्तिक माहिती पुस्तिका *

खाते नंबर :

भाडेकऱ्याचे संपूर्ण नांव श्री./सौ. ____________________

पत्ता ____________________

____________________

# कर्नल आर.डी.निकम सैनिक सहकारी बँक लि.

## सेफ डिपॉझिट व्हॉल्टबाबत भाडे करारनामा

| कोर्ट स्टॅम्प ५ रुपयाचा |
|---|

कर्नल आर.डी.निकम सैनिक सहकारी बँक लिमिटेड,तर्फे मॅनेजर / एजंट
राहणार ______ वय वर्षे ______ धंदा ______ — करारनामा लिहून घेणार

श्री.सौ. ______

______

______

______ — करारनामा लिहून घेणार

वय वर्षे ______ धंदा ______

राहणार ______ पत्ता ______

आज रोजी आपल्या बँकेच्या सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधील एक कप्पा आत जिन्नस ठेवण्याकरिता भाड्याने वापरण्यास मिळावा म्हणून आम्ही विनंती अर्ज केला तो आपण मान्य करुन आम्हांस ______ वर्गाचा कप्पा नंबर.............................. भाड्याने वापरण्यास देण्याचे कबूल केल्यावरुन आम्ही आपणास करारनामा लिहून देत आहोत तो असा की –

१) आपले बँकेतील सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधील कप्पे भाड्याने देण्याबाबत जे नियम आज अस्तित्वात आहेत ते सर्व आम्ही वाचले व ते आम्हास मान्य आहेत. यापुढे वेळोवेळी संचालक मंडळ जे नियम करतील अगर त्यात दुरुस्त्या करतील ते नियम व दुरुस्त्या आमचेवर बंधनकारक राहतील. या करारनाम्यात अशा कोणत्याही चालू व पुढे होणाऱ्या नियमांचा व दुरुस्त्यांचा उल्लेख केला नसला व करता येत नसला तरी आम्ही वर मान्यता दर्शवली व बंधन पत्करले. त्यामुळे त्यास बाधा येत नाही व त्याप्रमाणे आम्ही वागू.

२) सदर करार नाम्याचे पोटी आज रोजी आपणास भाडे रु..................................आगाऊ द्यायचे ते दिले आहेत.

३) करारनाम्याची मुदत आजपासून ........................... महिने / वर्षे आहे. ह्या मुदतीत आम्ही बँकेचा कप्पा मोकळा करुन देऊ. मुदतीपुढे कप्पा वापरण्याकरिता आमचेकडे ठेवण्याचा असल्यास व आपण ठेवू दिल्यास या करारनाम्याची मुदत संपण्यापूर्वी नियमाप्रमाणे आगाऊ भाडे देऊ.याप्रमाणे आम्ही न वागल्यास नियमाप्रमाणे आमचेवर पडणाऱ्या जबाबदारिस पात्र असू.

४) भाडे कराराची मुदत संपण्यापूर्वी मी /आम्ही मयत झाल्यास आमचे अधिकार ज्या कोणास द्यायचे ते अधिकारपत्र मी/आम्ही निराळे देऊन आपणाकडे ठेवले आहे. जरुर लागल्यास ते पुढे देण्याची मी /आम्ही व्यवस्था करु.

५) आम्ही सोबत आमचे स्वखर्चाने ओळखीकरिता म्हणून फोटो आयडेन्टिटी साईजचा देत आहोत.

६) कप्प्याच्या अंगच्या दोन कुलूपाच्या प्रत्येकी एक अशा दोन किल्ल्या आहेत त्यापैकी एक किल्ली आपलेजवळ असून दुसरी आपण आम्हास दिली ती आम्ही जतन करु व हरविल्यास ताबडतोब कळवू.किल्ली आमचेकडून हरविल्याने किंवा आमच्या दुसऱ्या कोणत्याही कृत्याने बँकेच्या इमारतीचे,कप्प्याचे वगैरे अगर कोणतेही नुकसान झाल्यास ते आम्ही बिनतकार भरुन देऊ.

७) आम्हास वापरण्यात दिलेला कप्पा मोकळा करुन न दिल्यास सेफ डिपॉझीट व्हॉल्टमधील कप्पा भाड्याने देण्याबाबतच्या नियमान्वये तजवीज करुन आपण आमच्या खर्चाने व आमच्या जबाबदारीवर आपणाकडे ठेवलेल्या नॉन रिफंडेबल लॉकर्स डिपॉझिटमधून आमचे खर्चाने मोकळा करुन द्यावा. तसेच जोपर्यंत कप्पा माझे /आमचे नावावर आहे, तोपर्यंत सदरची डिपॉझिटची रक्कम बँकेने परत देऊ नये सदरची डिपॉझिटची रक्कम कमी करण्याचा अगर वाढविण्याचा अधिकार बँकेस राहील व तो आमचेवर बंधनकारक राहील.सदर डिपॉझिटवर सेव्हिंग्ज दराने व्याज देण्यात येईल याची मला /आम्हाला कल्पना आहे.

८) आज रोजी सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधील ______________________ वर्गाचा कप्पा नंबर______________ या वापरण्याकरिता प्रत्यक्ष रितीने आम्हास या करारान्वये आपण दिला व आम्ही घेतला आहे.

९) आमच्या कोणत्याही कृत्यामुळे बँकेचे जे नुकसान होईल त्याचा बोजा कप्प्यामध्ये असलेल्या जिनसावर असल्याचे आम्हास कबूल आहे. आम्ही अगर आमच्याकरिता आमच्या अधिकृत इसमांनी अगर वालीवारस वगैरेनी बँकेचे आमचेकडे सेफ डिपॉझिट व्हॉल्टबाबत येणे होईल ते न दिले तर सदरचे जिन्नस बँकेचे नियमाप्रमाणे विकून वसूल करुन घ्यावे. वसूल कमी आल्यास ते पुरे करण्यास आम्ही जातीने बांधून घेत आहोत. आमच्या पश्चात आमचे इतर इस्टेटीमधून ते पुरे करण्याबाबत मुभा राहील.

१०) हा करारनामा व सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधील कप्पे भाड्याने देण्याबाबतचे बँकेचे सर्व नियम व या दोहोमुळे उत्पन्न होणारे आपणा उभयतांचे अंतर्गत परस्पर संबंध व आमच्यावर येत असलेल्या जबाबदाऱ्या व बंधन यास आम्ही जिम्मेदार आहोत व आमच्या पश्चात आमचे वेळोवेळी नेमून दिलेले अधिकृत इसम,वालीवारस, एक्झिक्युटर,ॲडमिनिस्ट्रेटर व असायनीज वगैरे सर्व हेही त्यास आमच्याप्रमाणे जिम्मेदार आहेत.

११) माझे लॉकर भाड्याची रक्कम माझे आपल्या बँकेतील खाते नं............................. ला नावे लिहून वसूल करण्याबाबत अधिकार देत आहोत.

येणेप्रमाणे हा भाडे करारनामा मी /आम्ही आपल्या राजीखुशीने व अक्कलहुशारीने लिहून दिला असून त्यावर आज रोजी मी/ आम्ही आपली सही केली आहे. व आपणही आपली सही केली आहे.

लिहून घेणाराची सही

लिहून देणाराची सही

______________________

______________________

______________________

______________________

शाखाधिकारी

कर्नल आर.डी.निकम सैनिक सहकारी बँक लि.

# कर्नल आर. डी. निकम सैनिक सहकारी बँक लि.

## इंडेक्स कार्ड

## सेफ डिपॉझिट व्हॉल्टबाबत

फोटो

१) भाडेकऱ्याचे संपूर्ण नाव ______________________

२) पत्ता ______________________

______________________ फोन नं. ______________________

३) व्यवसाय ______________________ वय ____________

४) कप्प्याचा वर्ग ______________________

५) कप्प्याचा नंबर ______________________

६) सांकेतिक शब्द ______________________

७) मृत्यूनंतर कप्पा कोणी उघडावा त्याचे नाव व पत्ता ______________________

______________________

८) नमुन्याची सही –

______________________

______________________

______________________

______________________

## कर्नल आर.डी.निकम सैनिक सहकारी बँक लि.

(खाजगी व गुप्त) शाखा :–

दिनांक : / /२०

कर्नल आर.डी.निकम सैनिक सहकारी बँक लि. च्या सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधील ______________________ वर्गाचा कप्पा नंबर ____________ मी /आम्ही सदर बँकेकडून तिने केलेल्या नियमांस पात्र राहून भाड्याने घेतला असून सदर कप्पा वापरण्याकरिता घेतला आहे व त्याची किल्ली मला / आम्हांला आज रोजी सदर बँकेकडून मिळाली असल्याने मी /आम्ही ही पावती सदर बँकेस लिहून देत आहे /आहोत.

भाडेकऱ्याची सही

______________________

______________________

______________________

# कर्नल आर.डी.निकम सैनिक सहकारी बँक लि.

शाखा :-

दिनांक : / /२०

मा.मॅनेजर,
कर्नल आर.डी.निकम सैनिक सहकारी बँक लि.

मला /आम्हाला आपल्या बँकेच्या सेफ डिपॉझिट व्हॉल्टमध्ये ________ वर्गामधील एक कप्पा (लॉकर) नंबर ________ चा तारीख / /२० पासून पुढे ________ महिने /वर्षे मुदतीने वापरण्याकरिता मिळावा अशी विनंती आहे. सदर कप्प्याचे जे भाडे असेल ते मी /आम्ही नियमाप्रमाणे आगाऊ भरण्यास तयार आहे/आहोत. सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधील कप्पे भाड्याने देण्याबाबत बँकेने जे नियम केले आहेत ते मी / आम्ही वाचले असून ते मला/ आम्हाला मान्य आहेत आणि सदर नियम व त्यात संचालक मंडळ वेळोवेळी ज्या दुरुस्त्या करील व भाडे वाढवील ते सर्व मजवर /आम्हावर बंधनकारक असून त्याचप्रमाणे वागण्याचे मी /आम्ही कबूल करतो. माझे /आमचे पश्ःच्यात, माझ्या/आमचे अधिकृत इसमावर असाईनी, एक्झिक्युटर, ॲडमिनिस्ट्रेटर व वालीवारस वगैरेवर ते बंधनकारक राहतील व त्याचप्रमाणे त्यांनी वागले पाहिजे व वागतील.

वरील नियमाप्रमाणे जर मला/आम्हांला कप्पा वापरण्याकरिता भाड्याने देण्यात आला व तो मोकळा करुन देण्यापूर्वी मला/आम्हांला मृत्यू आला तर सदर माझे/ आमचे ह्यातीनंतर मला /आम्हांला देण्यात आलेल्या किल्लीने उघडून त्यामधील चीजवस्तू माझ्यातर्फे /आमच्यातर्फे घेण्यासाठी मी /आम्ही ________
राहणार ________
यांची नेमणूक करीत आहे /आहोत,ही विनंती.

| ओळख देणाराची माहिती व सही | अर्जदाराची माहिती व सही |
|---|---|
| सही ________ | सही ________ |
| संपूर्ण नांव ________ | संपूर्ण नांव ________ |
| पत्ता ________ | पत्ता ________ |
| खाते ________ नंबर ________ | खाते ________ नंबर ________ |
| व्यवसाय ________ | व्यवसाय ________ |
| सभासद क्र. ________ | सभासद क्र. ________ |

---

## कर्नल आर.डी.निकम सैनिक सहकारी बँक लि.

( फक्त ऑफिसचे उपयोगाकरिता )

श्री. ________ यांना

त्यांचे अर्जाप्रमाणे ________ वर्गाचा कप्पा नंबर ________

हा तारीख ________ पासून पुढे ________

महिने /वर्षे मुदतीने भाड्याने द्यावा व त्यांचेकडून आगाऊ रोख भाडे रुपये ________ घेऊन तसेच

Nonrefundable Deposit घेऊन व ठराविक नमुन्यात भाडे करारनामा लिहून घेऊन कप्प्याची किल्ली त्यांच्या ताब्यात द्यावी व त्यांना सदर कप्याचा उपयोग वरील मुदतीपर्यंत करु द्यावा.